दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १८७ • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार, दि.१२ मे २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## कुत्र्याचे शेपूट वाकडेच असते,ते कापावेच लागते

# पाकिस्तान विश्वासघातकी देश; एकनाथ शिंदे यांची शस्त्रसंधीच्या उल्लंघनावर टीका

ठाणे (वृत्तसंस्था)–भारत आणि पाकिस्तानमध्ये सध्या तणावाचे वातावरण आहे. शनिवारी सायंकाळी शस्त्रसंधी लागू करण्यात आली. मात्र त्यानंतर काही तासांतच पाकिस्तानने पुन्हा जम्मू काश्मीरमध्ये हल्ला केला. त्यामुळे आता पुन्हा भारत पाकिस्तान युद्ध सुरू होणार की काय असा प्रश्न उपस्थित झाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी करत भारत आणि पाकिस्तान तात्काळ शस्त्रसंधी करण्यासाठी तयार झाले आहेत, अशी घोषणा केली होती. त्यानंतरही पाकिस्तानने हल्ला केला. यावर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. कुत्र्याचे शेपूट वाकडेच असते, अशी टीका त्यांनी केली आहे.



### हा विश्वासघातकीपणा आहे

एकनाथ शिंदे म्हणाले, जेव्हा शस्त्रसंधी झाली होती. त्यानंतर पाकिस्तानी लष्कराचे डीजीएमओ यांनी भारताच्या डीजीएमओशी चर्चा करून पुढाकार घेतला होता. दोन्ही देशांच्या संमतीने शस्त्रसंधी झाली होती. भारत नेहमी जो शब्द देतो, तो पाळतो. पण, पाकिस्तानचे हे कृत्य, हा विश्वासघातकीपणा आहे, असे शिंदे म्हणाले आहेत, ते ठाण्यात माध्यमांशी बोलत होते.

### पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर मिळाले आहे

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, यापूर्वीही त्यांनी अनेक वेळा शस्त्रसंधीचे उल्लंघन केलेले आहे. मोदींनी त्यांना सुधारण्याची संधी देण्यासाठी दिली होती, पण मला नाही वाटत की ते सुधरतील. आता रात्री त्यांनी जे केले आहे, आपल्या नागरिकांवर हल्ला करण्याचा प्रयत्न. पण, पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर मिळाले आहे.

### पाकिस्तानला धडा शिकवला जाईल

आपले सैन्य पूर्णपणे तयार आहे. मोदींना कदाचित माहिती होतं की, असे कृत्य करतील. त्यामुळे पंतप्रधान मोदींनी शस्त्रसंधीबद्दल ट्विटही केले नव्हते. पण, वारंवार अशी कृत्ये केल्यानंतर पाकिस्तानला धडा शिकवला जाईल. भारतीय लष्कर इतकं शक्तिशाली आहे की, पाकिस्तानला रात्री जशास तसे उत्तर रात्रीच दिले आहे, असेही एकनाथ शिंदे म्हणाले.

### कुत्र्याचे शेपूट वाकडेच असते

एकनाथ शिंदे म्हणाले, पाकिस्तानला माहित आहे की, भारतासोबत लढणे सोपे नाहीये. भारतासोबत लढलो, तर पराभव होईल. आमचे अस्तित्वही मिटेल. मी तर म्हणेल की, कुत्र्याचे शेपूट असते, ते सरळ नाही होत, ती वाकडीच राहते. त्यासाठी तिला कापावे लागते. पाकिस्तान सुधरला नाही, तर राष्ट्रभक्त पंतप्रधान मोदी त्याचा पूर्ण बंदोबस्त करतील. विश्वासघात करणाऱ्या पाकिस्तानला उत्तर देतील. मी आधीही म्हणालो की, जगाच्या नकाशावरून पाकिस्तानचे नामोनिशाण मिटवण्याची हिमंत भारतामध्ये आहे. शस्त्रसंधी करून हल्ले करत आहे. हा पाकिस्तानचा दुटप्पीपणा आहे. त्याला सगळे मिळून उत्तर देतील.

---

**वनविभागाला निर्देश** | अंत्यसंस्कारात सहभागी होऊन केले मृतकांच्या कुटुंबियांचे सांत्वन

# त्या' हल्लेखोर वाघिणीचा तात्काळ बंदोबस्त करा-विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेलेल्या तीन महिलेवर वाघीणीने प्राण घातक हल्ला चढविला व यात तीनही महिलांचा दुर्दैवी अंत झाला. सदर घटना काल दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास सिंदेवाही वनपरिक्षेत्रा अंतर्गत उपवनक्षेत्र डोंगरगाव मधील चारगाव कक्ष क्रमांक २५२ येथे घडली. मृतकांमध्ये कांता बुधाजी चौधरी (६५) शुभांगी मनोज चौधरी (२८ ) रेखा शालिक शेंडे (५०) यांचा समावेश असून तीनही मृतक महिला या सिंदेवाही तालुक्यातील मेंढामाल येथील रहिवासी आहेत. अकस्मात घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण मेंढा माल गावात शोककळा पसरली.



सदर घटनेची माहिती मिळतात क्षेत्र दौरावर असलेले विधिमंडळ पक्षनेते तथा लोकलेखा समिती अध्यक्ष व ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांनी आज वाघ हल्यात मृत पावलेल्या तीनही महिलांच्या अंत्यसंस्कारात सहभागी होऊन त्यांच्या कुटुंबीयांची सांत्वन केले. अंत्यसंस्कार आटोपताच उपस्थित वनविभागाचे उपवनसंरक्षक राकेश सेपट, वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल सालकर, पोलीस निरीक्षक राठोड तसेच उपस्थित गावकरी व वन विभाग कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी यांच्याशी तात्काळ चर्चा करून हल्लेखोर वाघिणीचा तात्काळ बंदोबस्त करा तसेच घडलेल्या घटनेचा गांभीर्याने विचार करून मृतकांच्या कुटुंबीयातील व्यक्तीला वनविभागाच्या सेवेत रुजू करून घ्या. व मृताच्या कुटुंबीयांना विभागाकडून देय असलेला मोबदला तात्काळ देण्याचे निर्देश यावेळी विधिमंडळ पक्ष नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी दिले. सोबतच अशा दुर्दैवी घटना यापुढे घडू नये याकरिता विशेष उपाययोजना करण्याचेही त्यांनी यावेळी उपस्थित वनअधिकाऱ्यांना सांगितले. याप्रसंगी प्रामुख्याने सिंदेवाही काँग्रेस शहराध्यक्ष सुनील उट्टलवार , सिंदेवाही नगराध्यक्ष भास्कर नन्नावार, मेंडामाल कांग्रेस कमिटी शाखाध्यक्ष वामनराव कोकोडे, गुरुदासजी बोरकर, युवक काँग्रेस तालुका अध्यक्ष अभिजीत मुप्पीडवार, नथूजी सोनुले प्रामुख्याने उपस्थित होते.

---

# वैनगंगा दुर्घटना : तीन वैद्यकीय विद्यार्थ्यांचा मृत्यू

## मुनगंटीवार व वडेट्टीवार यांची संवेदना व मदतीसाठी पाठपुरावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गडचिरोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रथम वर्षात शिक्षण घेणाऱ्या तीन युवकांचा वैनगंगा नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना शनिवारी (१० मे) दुपारी चारच्या सुमारास सावली तालुक्यातील व्याहाड (बुज.) गावाजवळील नदीपात्रात घडली. या हृदयद्रावक घटनेनं वैद्यकीय वर्तुळासह संपूर्ण राज्यात हळहळ व्यक्त होत आहे.मृतांमध्ये गोपाल गणेश साखरे (२०, रा. चिखली, जि. बुलढाणा), पार्थ बाळासाहेब जाधव (२०, रा. शिर्डी, जि. अहमदनगर), आणि स्वप्निल उद्धवसिंह शिरे (२०, रा. छत्रपती संभाजीनगर) या प्रशिक्षणार्थी डॉक्टरांचा समावेश आहे. हे सर्वजण सहा जणांच्या गटात सुट्टीच्या दिवशी नदीकाठी गेले होते. खेळताना चेंडू पाण्यात गेल्याने त्याला शोधताना तिघे खोल पाण्यात गेले व बुडाले.



अंधारामुळे शोध मोहीम थांबवावी लागली होती, मात्र रविवारी सकाळी आठच्या सुमारास मृतदेह आढळून आले.पोलीस व बचाव पथकांनी मृतदेह सावली ग्रामीण रुग्णालयात पाठवले असून, शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.या वेळी नगराध्यक्ष लता लाकडे, पोलीस उपनिरीक्षक सचिन मुसळे, नगरसेवक प्रितम गेडाम, अंतबोध बोरकर, सामाजिक कार्यकर्ते गब्बर दुधे, कमलेश गेडाम, पत्रकार उदय गडकरी, सूरज बोम्मवार आदी उपस्थित होते.

### विजय वडेट्टीवार यांची तात्काळ रुग्णालयात उपस्थिती

घटनेची माहिती मिळताच विधानसभा विरोधी पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी तात्काळ सावली ग्रामीण रुग्णालय गाठून मृतांच्या कुटुंबियांची भेट घेतली व त्यांना सांत्वन केलं. मृत विद्यार्थी हे अत्यंत गरीब व होतकरू असल्याने त्यांच्या कुटुंबांना सहकार्य मिळावं यासाठी ते थेट मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.ही मुलं समाजसेवेचं स्वप्न उराशी बाळगून वैद्यकीय शिक्षण घेत होती. त्यांच्या कुटुंबांना शासनाकडून सहकार्य मिळणं गरजेचं आहे, असं वडेट्टीवार म्हणाले.

### दु:खाचा डोंगर शासनाच्या मदतीनं हलका व्हावा–मुनगंटीवार

या घटनेनंतर राज्याचे माजी वनमंत्री व आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्र पाठवून प्रत्येक कुटुंबाला पाच लाख रुपयांची तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी केली. मुख्यमंत्री सहायता निधीतून ही मदत मिळावी यासाठी त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस व अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्याशी दूरध्वनीवरूनही संपर्क साधला.या कुटुंबांवर कोसळलेला हा दु:खाचा डोंगर शासनाच्या मदतीने काहीसा हलका व्हावा, हीच माझी भावना आहे, असं मुनगंटीवार यांनी स्पष्ट केलं.

---

# पालकमंत्र्यांकडून इरई नदी खोलीकरण कामाची पाहणी; कामाची गती वाढविण्याचे निर्देश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर शहराची जीवनवाहिनी असलेल्या इरई नदीच्या खोलीकरणाचे काम सर्वांच्या सहकार्याने हाती घेण्यात आले आहे. या कामाच्या प्रगतीची पाहणी करण्याकरिता राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी प्रत्यक्ष खोलीकरण होत असलेल्या ठिकाणी भेट दिली. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., महानगरपालिका आयुक्त विपिन पालीवाल, उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार तसेच संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.



चंद्रपूर शहराला ९ कि.मी. समांतर वाहणा–या इरई नदीच्या खोलीकरणाच्या कामाचा शुभारंभ २५ एप्रिल २०२५ रोजी करण्यात आला, असे सांगून पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, जिल्हा प्रशासनाने इरई नदीच्या खोलीकरण कामाचे योग्य नियोजन केले असले तरी कामाची गती वाढविणे आवश्यक आहे. चालू महिन्याअखेर पर्यंत सर्व नियोजित काम पूर्ण करावे. तसेच नदीतील गाळ शेतकऱ्यांना विनामूल्य देण्यात येत आहे. आतापर्यंत ४०० ब्रास गाळ मोफत वाटप करण्यात आला असून अर्ज केलेल्या सर्व शेतकऱ्यांना गाळ प्राधान्याने द्यावा, अशा सूचना त्यांनी केल्या.पहिल्या टप्प्यात राम सेतु ते चौरळा पूल दरम्यान अमुजमेंट पार्क जवळ व महर्षी शाळेमागे सध्या काम सुरू आहे. आतापर्यंत अमुजमेंट पार्क जवळ ३५० मीटर व महर्षी शाळेमागे १२० मीटर एकूण असे एकूण ४७० मीटर अंतरावरचे खोलीकरण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत कामावर ८ पोकलेन मशीन, १३ हायवा/ टिप्पर, २० ट्रॅक्टर, १ जे.सी.बी कार्यरत असून नदी पात्रातून आतापर्यंत ७५०० ब्रास गाळ करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना ४०० ब्रास गाळ वाटप करण्यात आले आहे.चंद्रपूर शहर ते इरई – वर्धा नदी संगमापर्यंतच्या १७ कि.मी. लांबीत इरई नदी पात्रातील वाढलेली झाडेझुडपे, गाळ काढून नदी पात्राचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे नदी पात्राची पूर वहन क्षमता वाढण्यास मदत होईल व शहराला दरवर्षी पडणारा पुराचा वेढा कमी होईल. तीन टप्प्यात खोलीकरण करण्यात येणार असून पहिला टप्पा रामसेतू ते चौराळा पुल, दुसरा टप्पा माना टेकडी (लालपेठ कॉलरी) आणि तिसरा टप्पा इरई ते वर्धा नदी संगमापर्यंतचा आहे.

आम्ही शोधत आहोत!
ऑफसेट मशीन ऑपरेटर
*किमान २ वर्ष अनुभव असणे आवश्यक
WE ARE HIRING!
Offset Machine Operator
*Min 2 Years Experience required
आकर्षक पेमेंट | जेवण | राहण्याची सोय
• संबंधित क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवार प्राधान्याने
• कामाची जबाबदारी, शिस्त आणि वेळेचं भान आवश्यक
कामाचे ठिकाण: वरोरा, जिल्हा चंद्रपूर



अधिक माहिती साठी संपर्क करा
+91 901 170 8840
मातछाया भवन. कल्यानेश्वर हनमान मंदिर समोर.
सह्याद्रीचा राखणदार
न्यूज अँड एंटरटेनमेंट एल.एल.पी





# समाज उन्नतीचे खरे कार्य हे शाळांमधूनच घडते-आ.भोंगळे

## उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचा उत्साही समारोप, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव




**चंद्रपूर ( प्रतिनिधी) :समाज उन्नतीचे खरे कार्य हे शाळांमधूनच घडते. शिक्षकांनी चौकटीबाहेर जाऊन काम केल्यासच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शक्य होतो. विशेषतः आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी शाळांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे, असे प्रतिपादन आमदार देवराव भोंगळे यांनी केले.एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, चंद्रपूर यांच्या वतीने पाटन येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत आयोजित उन्हाळी प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार भोंगळे होते. यावेळी प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार, नगर पंचायतीचे मुख्याधिकारी यमाजी धुमाळ, सहायक प्रकल्प अधिकारी आर. एस. बोंगिरवार व राजीव धोटकर, मुख्याध्यापक वासुदेव राजपूरोहित, कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, शिक्षक, प्रशिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

कार्यक्रमाची सुरुवात भगवान बिरसा मुंडा, वीर बाबुराव शेडमाके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन आणि राज्यगीताने करण्यात आली.शिबिरात विद्यार्थ्यांना तायक्कांडो, आर्चरी, योगा, ढोलवादन, इंग्रजी संभाषण, ड्रेस डिझायनिंग अशा विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात आले. याचे प्रभावी प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विशेषतः गोंडी नृत्याच्या सादरीकरणाने संपूर्ण वातावरण भारावून गेले.विद्यार्थ्यांनी गोंडी व वारली चित्रांच्या माध्यमातून पाहुण्यांचे स्वागत केले. शिबिरात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षक, कर्मचारी व प्रशिक्षकांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला. प्रकल्प कार्यालयातील विशेष योगदान देणाऱ्या अधिकाऱ्यांचा देखील सत्कार करण्यात आला.शिबिरात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध पुरस्कार देण्यात आले. ड्रेस डिझायनिंग कोर्समध्ये प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पाच शिलाई मशीन भेट देण्यात आल्या, तर संपूर्ण शिबिरात सरस ठरलेल्या सात विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स गिअर सायकल व प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात आले. या विद्यार्थ्यांमध्ये देवाडा, बोर्डा, पाटन, कोरपना, गोंडपिपरी आणि सरडपार येथील शाळांतील विद्यार्थ्यांचा समावेश होता.विद्यार्थ्यांचे मूल्यांकन प्रशिक्षक व शाळेतील मूल्यांकन समितीच्या संयुक्त परीक्षेनंतर करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक वासुदेव राजपूरोहित यांनी केले. संचालन सपना पिंपळकर यांनी तर आभार प्रदर्शन श्री. पुणेकर यांनी केले.

# मुद्देश वाडगाव येथील श्रद्धा बोरुडे यांची छत्रपती संभाजी नगर महापालिकेत नियुक्ती

**वैजापूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील मुद्देश वाडगाव येथील श्रद्धा चांगदेव बोरुडे यांची छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका येथे स्थापत्य अभियंता सहाय्यक (अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निरीक्षक) या पदावर नियुक्ती झाली आहे. या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण आहे.



श्रद्धा बोरुडे यांनी गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक, औरंगाबाद येथून डिप्लोमा व हाय-टेक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, औरंगाबाद येथून स्थापत्य अभियांत्रिकी (इ.ए.) पदवी प्राप्त केली आहे. महानगरपालिकेच्या खुल्या भरती प्रक्रियेत त्यांनी यश मिळवले.त्यांच्या या यशामागे कुटुंबीयांचा मोलाचा वाटा आहे. वडील चांगदेव बोरुडे हे शेतकरी असून आई छाया बोरुडे या गृहिणी आहेत. कुटुंबाचा आधार आणि श्रद्धाची मेहनत, जिद्द व आत्मविश्वास या सर्वांनी मिळून हे यश शक्य झाले आहे.गावातील सरपंच योगेश तारु, ग्रामस्थ, शिक्षक, मित्रपरिवार व नातेवाईकांनी श्रद्धा बोरुडे यांचे अभिनंदन केले असून भविष्यात त्या प्रामाणिकपणे सेवा बजावतील, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# भिसीच्या विकासासाठी आ.भांगडियांचा मास्टरस्ट्रोक!

## अतिक्रमणधारकांना मिळणार मालकी हक्काचे गाळे-२.७२ कोटींचा निधी मंजूर

**चिमूर । शेषराव राऊत**

राजकारणात अनेक जण आश्वासन देतात, पण ते पाळणारे फार थोडे! चिमूरचे आमदार कीर्तीकुमार भांगडिया हे त्यातील अपवाद. भिसी येथील रस्त्यालगत अतिक्रमण हटविल्यानंतर उघड्यावर पडलेल्या दुकानदारांना दिलासा देण्यासाठी त्यांनी केलेली तातडीची धावपळ आता फलद्रूप झाली आहे.



महानगराचा स्पर्श लाभलेल्या भिसी गावातील अतिक्रमणग्रस्त व्यावसायिकांना मालकी हक्काचे गाळे देण्यासाठी २ कोटी ७२ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेंतर्गत हे गाळे बांधले जाणार असून, प्रशासकीय मान्यता सुद्धा मिळाली आहे.आ. भांगडिया यांनी रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी अतिक्रमण काढताना स्पष्ट सांगितले होते व्यवसाय मोडू देणार नाही, गाळे बांधूनच देणार! आज त्यांच्या त्या शब्दाला मूर्त स्वरूप लाभले आहे. लवकरच दुकानदारांना नवी जागा मिळणार असून त्यांचं पुनर्वसन सन्मानाने होणार आहे.भिसी गावाचा चेहरामोहरा बदलण्याच्या प्रक्रियेला आता वेग येणार असून, आमदार भांगडियांच्या पुढाकारामुळे विकासाच्या वाटचालीला गती मिळाली आहे. व्यापारी वर्गाने त्यांचे आभार मानले असून, हे आमदार खरोखर जनतेचे आहेत! असा सूर परिसरात उमटत आहे.

# मुख्याध्यापक अनिल ढवस यांचा सेवानिवृत्त सत्कार समारंभ आज

**भद्रावती । प्रतिनिधी**

विवेकानंद ज्ञानपीठ वरोरा द्वारा संचालित तालुक्यातील मांगली (रै) येथील विवेकानंद माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल देवराव ढवस हे सेवानिवृत्त होत आहे. त्यानिमित्ताने आज दिनांक १२ मे २०२५ रोज सोमवारला सकाळी ९.३० वाजता मांडली येथील विवेकानंद विद्यालयाच्या प्रांगणात त्यांच्या सन्मानार्थ सेवानिवृत्ती सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या समारंभाचे अध्यक्षस्थानी विवेकानंद ज्ञानपीठ वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून विवेकानंद ज्ञानपीठाचे सचिव अमन टेमुर्डे, भद्रावती पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी डॉ प्रकाश महाकाळकर, मांगली येथील सरपंच धनराज पायघन, केंद्रप्रमुख सुनील मामीडवार, भद्रावती शहरातील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते प्रा. धनराज आस्वले, पत्रकार पी.जे.टोंगे उपस्थित राहणार आहेत. यावेळी



विवेकानंद ज्ञानपीठाचे उपाध्यक्ष जयंत टेमुर्डे, सहसचिव राजेंद्र गावंडे, कोषाध्यक्ष अभिजीत बोथले, सदस्य सर्वश्री झेड.बी. लांबट, ईजाज अ.मोहम्मद, डॉ. मायाताई राजूरकर, डॉ. विजय गावंडे, डॉ. शैलेश महाजन यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न होत आहे. तरी या सेवानिवृत्ती सत्कार समारंभास विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी केले आहे.

# खा.बाळ्यामामा म्हात्रे यांच्याकडून भिवंडी काल्हेर-अंजुरफाटा रस्त्याचा पाहणी दौरा

**बदलापूर । प्रतिनिधी**

भिवंडी काल्हेर-अंजुरफाटा रस्त्यावर हालचाल करणार्या वाहनांना नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता. कशेळीकडून अंजुरफाटा रस्त्यावर पाणी साचून वाहतूक ठप्प झाली होती. या समस्येचा अभ्यास आणि उपाययोजना शोधण्यासाठी खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली मेट्रो, एमएमआरडीए आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत रस्त्याचा पाहणी दौरा आयोजित करण्यात आला.




पाहणी दरम्यान, रस्त्यावरील पाणी तुंबण्याचे मुख्य कारण नाल्यांचे बंद होणे आणि अपुरी गटारव्यवस्था असल्याचे निदर्शनास आले. रस्त्याच्या आसपासच्या बिल्डिंगचे बिल्डरांनी नैसर्गिक नाले बंद करून विकास कामे केली, ज्यामुळे पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचते. खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांनी सांगितले की, भविष्यात वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि गावांचे संरक्षण करण्यासाठी या नैसर्गिक नाल्यांना पुन्हा उघडण्याची आवश्यकता आहे.


त्यांनी सांगितले, विकास आवश्यक आहे, पण तो नियोजनबद्ध पद्धतीने आणि परवानगी घेऊन व्हावा. ग्रामपंचायतीच्या परवानग्यांवरच अनियमित इमारती उभ्या राहिल्या आहेत, ज्यामुळे भविष्यात मोठे संकट उद्भवू शकते. खासदारांनी यावर समाधान शोधण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून तातडीने उपाययोजना करण्याची शपथ घेतली आहे.पाहणी दौऱ्यातून मिळालेल्या माहितीनुसार, विशेषतः रस्त्यावर जलकुंड साचणे, नाले न बंद करणे आणि संबंधित कायदेशीर प्रक्रिया पार न करण्यामुळे ही समस्याही निर्माण झाली आहे. खासदार म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली यावर समाधान मिळवण्यासाठी पुढील पाऊल उचलण्यात येईल.

# सामाजिक बांधिलकी जपत केला वाढदिवस साजरा

## समाज प्रबोधनाचा नवीन पायंडा पाडत, शालेय साहित्याचे दान

**कोल्हार । प्रतिनिधी**

समाजसेवा आणि सामाजिक बांधिलकी यांना महत्व देत शिवसेनेचे संगमनेरचे लोकप्रिय आमदार अमोल खताळ यांनी आपला वाढदिवस अत्यंत विशेष पद्धतीने साजरा केला. पारंपरिक हार-फुले, सेल्फी, डीजेचा आवाज, आणि आतिशबाजीला फाटा देत, त्यांनी गरजू विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्याचे दान देऊन समाजप्रबोधनाचा एक नवा पायंडा पाडला.वाढदिवसाच्या दिवशी आमदार अमोल खताळ यांनी एक साधा परंतु मनाला भिडणारा मेसेज दिला, माझ्या वाढदिवसाला फुले हार नकोत, वह्या पुस्तकांची भेट हवी.या आवाहनाला कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला आणि हजारो कार्यकर्ते शालेय साहित्य - पेन, बॅगा, वह्या, वॉटर बॉटल्स, कंपास पेट्या आणि इतर आवश्यक वस्तू घेऊन संगमनेर येथील त्यांच्या निवासस्थानी पोहचले.



आमदार खताळ यांनी सांगितले की, या साहित्याचा वितरण लवकरच संगमनेर आणि परिसरातील गरजू विद्यार्थ्यांना करण्यात येणार आहे. यावेळी शिवसेना महिला आघाडी उत्तर नगर जिल्हा प्रमुख सुनिता शेळके यांनीही आपल्या सहकारी कार्यकर्त्यांसोबत शालेय साहित्य घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी संगमनेर येथील आमदार खताळ यांच्या निवासस्थानी पोहचल्या.संगमनेर तालुका प्रमुख रमेश काळे, शहर प्रमुख वैशाली तारे, तालुका प्रमुख विमल कुलकर्णी, मनिषा पंधारे, वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे सपना जाधव, दिव्या, कविता राहुल भाऊ, तेजु, स्वप्नील सातपुते, संदीप सोनवणे यांसह सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

वाढदिवसाच्या निमित्ताने, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या जिल्हा अध्यक्ष सुनिता शेळके आणि शिवसेना संगमनेर तालुका प्रमुख रमेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली एक सामाजिक आणि धार्मिक उपक्रम राबवला. यामध्ये राम मंदिर परिसरातील स्वच्छता मोहीम, मंदिरामध्ये पूजा, श्री जीवदया मंडळ आणि पांजरापोळ गोशाळेला चारा दान, आणि गोरगरीब अनाथ मुलांना खाऊ वाटप यासारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचा समावेश होता.संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांनी हार-फुले ऐवजी शालेय साहित्याचे दान मागून एक विधायक सामाजिक संदेश दिला. यावेळी शिवसेना महिला आघाडी उत्तर नगर जिल्हा प्रमुख सुनिता शेळके यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, राजकारणात एक वेगळी इमेज तयार करण्यासाठी नेत्यांची स्पर्धा चालू असताना, आमदार खताळ यांचा हा सामाजिक दृषटिकोन निश्चितच प्रेरणादायी आहे.

# महाविकास आघाडी कडून महालक्ष्मी मंदिरात महाआरतीच आयोजन

## भारतीय सैनिकाचे मनोबल वाढवण्यासाठी महाआरती!



**बदलापूर । प्रतिनिधी**

भारतीय सैन्यदलाने तिन्ही दलांच्या नेतृत्वाखाली आतंकवाद्यांविरुद्ध प्रचंड लढा दिला आहे आणि त्यांचे यशस्वी संरक्षण भारतासाठी अभिमानाचा विषय ठरला आहे. अशा परिस्थितीत, सैन्याचे मनोबल कायम राखणे महत्त्वाचे आहे, असे महाविकास आघाडीचे नेते अविनाश देशमुख यांनी म्हटले आहे.

देशाच्या सैन्य दलाचे मनोबल उंचावण्यासाठी महाविकास आघाडीने बदलापूर शहरातील महालक्ष्मी मंदिरात महाआरतीचे आयोजन केले होते. या उपक्रमाचे उद्दीष्ट भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करणे आणि त्यांचे मनोबल वाढवणे होते. यावेळी 'भारत माता की जय', 'भारतीय सैन्य दलाचा विजय असो' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता. तसेच, 'मुर्दाबाद पाकिस्तान' चा नारा देखील उठवण्यात आला.मंदिराच्या परिसरात नागरिकांसोबतच महाविकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाआरतीसाठी जणू एकच जल्लोष सुरू होता, आणि काही वेळासाठी मंदिराबाहेर वाहतूक खोळंबली होती. हा कार्यक्रम देशाच्या सैन्याबद्दल असलेल्या कृतज्ञतेचा आणि अभिमानाचा प्रतीक ठरला.

## पाईप जाळण्यामागे आमदारांचा आशीर्वादच?

# लाभार्थी गावाच्या नावाखाली स्वतःचे पाप झाकू नये-सरपंच आशिष गायकवाड यांचा थेट आरोप

**सोलापूर । प्रतिनिधी**

दहिगाव उपसा सिंचन योजनेतील बंद नलिका वितरण प्रणालीच्या कामावरून राजकारण चांगलेच तापले असून, देवळाली गावाचे माजी सरपंच व आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक आशिष गायकवाड यांनी थेट विद्यमान आमदार नारायण पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. लाभार्थी गावांच्या विरोधामुळे काम थांबले असा दावा करत आमदार पाटील यांनी वस्तुस्थिती झाकण्याचा प्रयत्न केला असून, खरे कारण त्यांच्या कार्यकर्त्यांमार्फत काम रोखण्यामागे विशिष्ट स्वार्थ असल्याचे गायकवाड यांनी स्पष्ट केले.

एका पत्रकार परिषदेत बोलताना आशिष गायकवाड म्हणाले, लमाझ्या देवळाली गावातील बंद नलिका वितरणाचे काम स्थानिक लोकांनी थांबवलेले नाही. आमदारांचे कार्यकर्ते गोरख जाधव यांनी येऊन हे काम थांबवले. मी स्वतः त्याला विचारणा केली असता 'कंत्राटदाराने आमदारांशी बोलूनच काम सुरू करावे' असे सांगण्यात आले. पुढे गोरख जाधव यांनी आमदारांचे बंधू राजू पाटील यांच्याशी फोनवर संपर्क साधून सांगितले की, 'सरपंचांनी कंत्राटदाराला आबांकडे पाठवा, विषय वाढणार नाही'. यावरून हे स्पष्ट होते की काम थांबवण्याचा आदेश आमदारांच्या संमतीनेच दिला गेला.गायकवाड पुढे म्हणाले, आज आमदार पाटील म्हणतात की लाभार्थी गावांनीच कामाला विरोध केला. हे खोटे आहे. पाईप जाळले गेले, काम थांबवले गेले ते त्यांच्या आशीर्वादानेच. याला लाभार्थी गावांच्या नावाची ढाल बनवून आमदार स्वतःचे राजकीय पाप झाकण्याचा प्रयत्न करत आहेत.त्यांनी नारायण पाटलांना खुलं आव्हान दिलं की, जर आमदारांचे गोरख जाधव आणि राजू अण्णा पाटील यांच्याशी संबंध नसतील, तर त्यांनी जाहीरपणे तसे सांगावे. आणि जर खरोखरच बंद नलिका योजनेला विरोध असेल तर ते सरकारला पत्र देऊन खुल्या कॅनलसाठी निधी मागावा. पण पाणी तर गावांपर्यंत पोहोचले पाहिजे.आज माझ्या गावाला एक थेंबही पाणी मिळालेलं नाही. काम थांबवलेलं आहे. एकीकडे तुम्ही सहा महिन्यात एक रुपयाचा निधी आणू शकत नाही आणि दुसरीकडे दुसऱ्यांनी आणलेल्या निधीवरची कामेही रोखता, हे चुकीचं आहे. तुम्ही सरकारचे प्रतिनिधी आहात आणि सरकारचं काम बंद पाडण्याचं समर्थन करता हे दुर्दैवी आहे, असा रोषही त्यांनी व्यक्त केला.



## वर्ध्याच्या साहिल वाघचा राष्ट्रीय नान चाकू चॅम्पियनशिपमध्ये दणदणीत विजय

### आता एशियन स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व

### रोबोस्ट जिममध्ये अश्विन साहू व डॉ.संजय मोगरे यांच्या हस्ते सत्कार

**वर्धा । संजीव वाघ**

वर्धा जिल्ह्यातील मार्शल आर्ट प्रशिक्षक साहिल उल्हास वाघ याने राष्ट्रीय नान चाकू चॅम्पियनशिपमध्ये फ्री स्टाईल नान चाकू प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे साहिलची निवड आता एशियन नान चाकू चॅम्पियनशिपसाठी झाली असून, तो भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.

साहिलच्या या यशाबद्दल युनिव्हर्सल मार्शल आर्ट स्पोर्ट्स अकॅडमी इंडिया, वर्धा जिल्ह्याचे सर्व सदस्य, गुरुजन व मार्गदर्शकांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले. कराटे मार्शल आर्ट ट्रेनिंग सेंटर सालोडचे संचालक संजीव



वाघ आणि संजय वाघ,डॉक्टर संजय मोगरे तसेच रोबोस्ट जिम वर्धाचे संचालक अश्विन साहू यांनी आपल्या जिममध्ये साहिलचा सत्कार करत त्याच्या यशाचे कौतुक केले.साहिलच्या एशियन स्पर्धेसाठी निवडीचे जिल्हाभरातून अभिनंदन होत असून, त्याच्यावर आता सर्वांच्या शुभेच्छांचा वर्षाव होत आहे

## पुलगावच्या महिलांचा स्तुत्य उपक्रम प्रवाशांना थंड पाण्याचे मोफत वाटप

**पुलगाव । प्रतिनिधी**

उकाड्याच्या तीव्रतेने हैराण झालेल्या प्रवाशांसाठी पुलगाव येथील काही महिलांनी एक प्रेरणादायी उपक्रम हाती घेतला आहे. पुलगाव बस स्थानकावरील प्रवाशांना दररोज मोफत थंड पाणी उपलब्ध करून देत त्या महिलांनी समाजसेवेचे सुंदर उदाहरण घालून दिले आहे.



पुलगाव बस स्थानकावर ग्रामीण भागातील प्रवासी आणि शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित असतात. मात्र, स्थानकावरील पाण्याची व्यवस्था अत्यंत तोकडी असून, विद्यमान प्याऊ व्यवस्थेत स्वच्छतेचा अभाव व पाण्याची अनुपलब्धता आहे. ही स्थिती लक्षात घेऊन शहरातील महिलांनी स्वतः निधी उभा करून रोज थंड पाण्याचे कॅन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला.या उपक्रमात सहभागी असलेल्या महिला म्हणजे – सुचिता बैतुले, प्रतिभा घालनी, प्रतिभा डोल्हारे, मीना शाहगडकर, ममता निकम, सविता ढोके, सुनिता गावंडे, अल्का बानाईत, दिपा काळे, अर्चना भोजने, जमनारे आणि पुनम तिवारी. या सर्व महिला दररोज बस स्थानकावर जाऊन प्रवाशांना पाणी वाटतात आणि त्यानंतर घरी परततात. त्यांच्या या नियमित सेवेमुळे प्रवाशांची तृष्णा शांत होते आणि त्या अनोख्या समाधानाचा अनुभव घेतात.या स्तुत्य उपक्रमाची दखल देवळी-पुलगावचे आमदार राजेश बकाने स्वतः घेतली. बस स्थानकावरील पाहणीदरम्यान त्यांनी महिलांच्या कार्याचे कौतुक केले आणि स्थानक व्यवस्थापनाला प्रवाशांसाठी पाण्याची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले.

## डॉ.जान्हवी भोसले यांना दीक्षांत समारंभात स्नातक पदवीने सन्मानित




**वर्धा । प्रतिनिधी**

स्थानिक कारला चौक परिसरातील रहिवासी डॉ. जान्हवी प्रशांत भोसले यांना दिनांक ६ मे रोजी सावंगी मेघे येथील विद्यापीठ सभागृहात झालेल्या दीक्षांत समारंभात आरोग्य सेवा शाखेची स्नातक पदवी प्रदान करण्यात आली.

दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था (अभिमत विद्यापीठ) च्या सोळाव्या दीक्षांत समारंभात प्रमुख मान्यवरांच्या हस्ते त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. जान्हवी भोसले यांनी आपल्या यशाचे श्रेय आजी-आजोबा तसेच आई-वडिलांना दिले.या सन्मानामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून, त्या प्रसिद्ध समाजसेवक आणि संत सयाजी महाराज यांची नात आहेत.

## वायगावच्या हळदीला सातासमुद्रापार मागणी-आकाश डंभारे यांचा गौरव

**वर्धा । प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेली वायगावची हळद आता आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचत असून, दुबईसह युरोपातील अनेक देशांमध्ये तिची निर्यात सुरू झाली आहे. यामुळे तालुक्याच्या ग्रामीण उत्पादनाला जागतिक बाजारपेठ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



नुकतीच वर्धा येथून पालकमंत्री पंकज भोयर आणि जिल्हाधिकारी वान्मी सी यांच्या हस्ते एक कंटेनर हळद दुबईला रवाना करण्यात आला. विशेष म्हणजे, या हळदीच्या निर्यातीसाठी प्रयत्नशील राहिलेले गिरड गावातील गरीब कुटुंबातील युवक आकाश डंभारे आणि त्यांच्या आई-वडिलांचा विशेष सत्कार पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. ईफिक्कीचे (EFFiCCI) सदस्य असलेल्या आकाश डंभारे यांनी वायगावच्या हळदीला दुबई, जर्मनी, डेन्मार्क, नेदरलँड्स यांसारख्या देशांमध्ये पोहोचवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे युरोपियन बाजारपेठेतील मागणीला प्रतिसाद मिळाला असून, स्थानिक शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळण्याची अपेक्षा आहे.

या उपक्रमामुळे वायगावच्या हळदीचे महत्त्व वाढले असून, इतर शेतकऱ्यांनाही निर्यातीसाठी प्रेरणा मिळत आहे. जिल्हा प्रशासन आणि शासनाच्या माध्यमातून अशा ग्रामीण तरुणांना प्रोत्साहन देण्यात येणार असल्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांनी यावेळी सांगितले.

## ७ महिन्यांच्या प्रयत्नांनंतर अल्पवयीन बालकाला कुटुंबाशी एकत्र करण्यास यश



**वर्धा । प्रतिनिधी**

तालुक्यातील तळेगाव पोलिस स्टेशनच्या हद्दीत ८ ऑक्टोबर २०२४ रोजी एक अल्पवयीन बालक सापडला होता. या बालकाच्या कुटुंबाचा शोध घेण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण समिती आणि पोलिस विभागाने सातत्याने प्रयत्न केले. तब्बल सात महिन्यांच्या प्रयत्नांनंतर अखेर या बालकाचे मूळ गाव व कुटुंब शोधून काढण्यात यश आले.

बालकास छत्तीसगड राज्यातील रायगड जिल्ह्यातील त्याच्या कुटुंबापर्यंत सुरक्षितपणे परत पाठवण्यात आले. या कार्यात बाल संरक्षण कक्ष, तळेगाव पोलिस स्टेशन, तसेच संबंधित राज्यातील अधिकाऱ्यांचे समन्वय महत्त्वाचा ठरला.

या संयुक्त प्रयत्नांमुळे एका अल्पवयीन बालकाचा आपल्या पालकांशी पुन्हा एकत्र होण्याचा मार्ग सुकर झाला आहे. बालकाच्या सुरक्षित पुनर्वसनामुळे संबंधित यंत्रणांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## सावनेर व कळमेश्वरमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर'

### महसूलमंत्री बावनकुळे आणि आमदार डॉ.आशिषराव देशमुख यांच्या उपस्थितीत जनतेच्या तक्रारींचे तात्काळ निवारण

**नागपूर । प्रतिनिधी**

'शासन तुमच्या दारी' या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागातर्फे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' सावनेर व कळमेश्वर येथे आयोजित करण्यात येत आहे. जनतेच्या थेट तक्रारी ऐकून त्यावर जागेवरच तात्काळ उपाययोजना व्हाव्यात, यासाठी आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या पुढाकारातून हे शिबिर होत असून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

सावनेर येथील शिबिर ११ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आमदार डॉ. आशिष देशमुख यांचे जनसंपर्क कार्यालय, पामकोर्ट लॉन, नागपूर रोड येथे होणार असून कळमेश्वरमधील शिबिर १३ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालयात पार पडणार आहे.

या शिबिरांमध्ये महसूलमंत्री श चंद्रशेखर बावनकुळे, आमदार डॉ. आशिष देशमुख, जिल्हाधिकारी डॉ. विपीन ईटनकर, जिल्हा परिषद नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्यासह विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. नागरिकांना त्यांच्या महसूलविषयक अडचणी, शासकीय योजनांची माहिती, तक्रारींचे निराकरण, प्रमाणपत्रांचे वाटप, आरोग्य तपासणी, आणि योजनासंबंधी थेट मार्गदर्शन दिले जाणार आहे.या शिबिराबाबत माहिती देताना आमदार डॉ. आशिष देशमुख म्हणाले, सर्वसामान्य जनतेचा व शेतमजुरांचा महसूल विभागाशी थेट संबंध येत असतो. त्यांच्या दैनंदिन समस्या समजून घेऊन, त्याचे त्वरित निवारण करण्यासाठीच हे शिबिर उपयुक्त ठरणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा.शासन आणि नागरिक यांच्यातील दुरावा कमी करून प्रशासन अधिक लोकाभिमुख व गतिमान करण्याच्या उद्देशाने या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून नागरिकांना शासकीय योजनांचा थेट लाभ मिळणार असून त्यांच्या समस्यांवर योग्य आणि वेळेत उपाययोजना होणार आहेत.

## न्यु महाराष्ट्र क्रेडिट को ऑप सोसायटी नागपूरचा महिलांसाठी कर्ज वाटप सोहळा

**नागपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील कोरमेटा गावात महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत कर्ज वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास न्यु महाराष्ट्र क्रेडिट को ऑप सोसायटी नागपूरचे उपाध्यक्ष संजय डहाट, संचालक प्रकाश नरोले आणि धर्मराज आहाके यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी प्रत्येक महिला लाभार्थीला ५० हजार कर्ज प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी केले होते, ज्यात स्वाती वाट, आशिष डहाट आणि क्षितिज वासनिक यांचे नियोजनबद्ध प्रयत्न विशेष ठरले. हा कर्ज वाटप सोहळा १० मे २०२५, शनिवार रोजी पार पडला.

कार्यक्रमामुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले गेले आहे.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप-सामाजिक सहभागातून उपक्रम राबविला



**वर्धा । प्रतिनिधी**

उच्च प्राथमिक जाळा शाळेतील इयत्ता १ ते ७ च्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन-पेंसिली आदी शालेय साहित्य वाटण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा अश्विनी चरडे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून समितीच्या उपाध्यक्षा पुनम राऊत, सुनिल साबळे, सामाजिक कार्यकर्ते अतुल होले, संत पांडुरंग महाराज देवस्थानचे विश्वस्त मारोतराव गाडे, श्री संत मारोती महाराज संस्थानचे अध्यक्ष राजेंद्र रेवस्कर, नंदकीजोर पाटील, रूपेर खाजबागे, रविंद्र आकोलकर तसेच जारदा शाळेच्या मुख्याध्यापिका तारा राठोड यांची उपस्थिती लाभली होती.

या उपक्रमामागील उद्देश विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य विनामूल्य उपलब्ध करून देणे, तसेच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देणे हा होता. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

## रामबागला धक्का नको..आमदार जोरगेवार यांची जिल्हाधिकाऱ्यांपुढे ठाम भूमिका

# लोकशाहीत जनभावनांचा विजय-जि.प.इमारती साठी होणार पर्यायी जागांचा विचार; बैठकित निर्णय

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

रामबाग मैदानावर जिल्हा परिषदेची इमारत उभारण्याच्या प्रस्तावाला नागरिकांनी दिलेला तीव्र विरोध अखेर यशस्वी ठरला आहे. आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत आमदार किशोर जोरगेवार यांनी आक्रमक भूमिका घेत रामबाग मैदानाला जराही धक्का लावू नका असे जिल्हाधिकाऱ्यांसमोर स्पष्ट शब्दांत सांगितले. त्यानंतर जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी सदर इमारतीसाठी पर्यायी जागेचा विचार केला जाईल असे मान्य केले आहे.

या बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा, महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी संजय पवार, पोलिस विभागाचे उपविभागीय अधिकारी सुधाकर यादव, आंदोलनकर्ते तथा जनविकास सेनेचे संस्थापक अध्यक्ष पप्पू देशमुख, दशरथसिंह ठाकूर, तुषार सोम, माजी नगरसेवक सुभाष कासनगोट्टूवार, मनोज पाल, माजी नगरसेवक राजेश अड्डूर, प्रदीप किरमे, वंदना हातगावकर, सविता दंढारे, रजनी पॉल, राशिद हुसेन, अमोल शेंडे, करणसिंह बैस, मंजुश्री कासनगोट्टूवार यांच्यासह नागरिक व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.


या बैठकीत आमदार किशोर जोरगेवार म्हणाले की, आमचा विकासकामांना कधीच विरोध नाही. मात्र विकासाच्या नावाखाली नागरिकांच्या भावनांवर आघात होत असेल, तर आम्ही कधीही गप्प बसणार नाही. रामबाग मैदान ही केवळ मोकळी जागा नाही, ती नागरिकांच्या आरोग्याशी, जीवनशैलीशी आणि भविष्यातील पिढ्यांशी जोडलेली आहे. हे मैदान खेळाडू, मुले आणि वृद्ध नागरिक यांचा श्वास आहे. हा केवळ मैदानाचा नव्हे, तर नागरिकांच्या हक्कांचा आणि लोकशाहीच्या



मूल्यांचा प्रश्न आहे. लोकशाहीत जनतेच्या भावना केंद्रस्थानी असल्या पाहिजेत. त्या पायदळी तुडवून कोणताही विकास होऊ शकत नाही असे ते यावेळी म्हणाले.या बैठकीत आमदार जोरगेवार यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा यांना जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीसाठी शहरात इतर पर्यायी जागा आहेत. त्या तपासून नागरिकांच्या भावना न दुखावता विकास साधावा अश्या सूचना केल्यात. त्यांच्या या स्पष्ट आणि आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेत मैदानाला धक्का न लावता पर्यायी जागा शोधनाचा निर्णय घेतला आहे. दुसरी जागा निश्चित करतानाही नागरिकांची सहमती घ्यावी, अशी सूचना आमदार किशोर जोरगेवार यांनी यावेळी केली. तसेच, इमारतीसाठी खोदण्यात आलेले रामबाग मैदान तातडीने पूर्ववत दुरुस्त करण्याचे निर्देशही त्यांनी दिलेत.आजचा दिवस हा जागरूक नागरिकांचा विजय आहे. तुम्ही आवाज उठवला, आपण त्या आवाजाला बळ दिले. शेवटी लोकशाहीत जनतेचा आवाज महत्त्वाचा असतो आणि तो ऐकला गेला, याचे समाधान आहे, असे आमदार किशोर जोरगेवार यांनी स्पष्टपणे सांगितले. बैठकीस संबंधित सर्व अधिकारी, आंदोलक, नागरी प्रतिनिधी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या हस्तक्षेपामुळे ट्रक चालक पुन्हा कामावर

## हर्षल शिंदे यांच्या नेतृत्वाखालील संघर्षाला यश



**भद्रावती (प्रतिनिधी): टाकळी, बेलोरा आणि जेना गावांतील स्थानिक ट्रक चालकांना कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक ॲरो माईन्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतून १ एप्रिल रोजी कामावरून कमी करण्यात आलं. यामुळे कुटुंबांवर बेरोजगारीचं संकट कोसळलं. मात्र हा अन्याय सहन न करता या युवकांनी युवासेनेच्या नेतृत्वाखाली संघर्ष सुरू केला आणि अखेर न्याय मिळवला.या आंदोलनात हर्षल शिंदे (युवासेना कार्यकारिणी सदस्य) यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या नेतृत्वात पीडित ट्रक चालकांचा आवाज थेट खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यापर्यंत पोहोचवण्यात आला. युवासेना जिल्हा प्रमुख आलेख रट्टे यांची देखील या संपूर्ण पाठपुराव्यात सक्रिय भूमिका होती. त्यांनी स्थानिक प्रश्न थेट राष्ट्रीय पातळीवर पोहचवण्याचे काम केले.**





दैनिक सह्याद्रीचा राखणदार

कामावरून कमी केलेल्या स्थानिक ट्रक चालकांच्या पुर्ननियुक्तीसाठी युवासेनेचे खा.श्रीकांत शिंदे यांना निवेदन

हर्षल शिंदे यांच्या नेतृत्वात निवेदन सादर; आलेख रट्टे यांची उपस्थिती

दैनिक सह्याद्रीचा राखणदार

स्थानिकांना रोजगार द्या; ट्रक चालकांना पुन्हा सेवेत घ्या; युवासेनेची आरो माइनिंगला मागणी

संघर्षाशिवाय न्याय नाही–आलेख रमेश रट्टे

निवेदन सादर करताना हर्षल शिंदे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं की, बाहेरगावाहून मजूर आणून स्थानिकांना हटवणे म्हणजे अन्याय. हा अन्याय आम्ही सहन करणार नाही. स्थानिक युवकांचे हक्क आम्ही हिरावून घेऊ देणार नाही. त्यांच्या या परखड भूमिकेमुळेच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी त्वरित दखल घेतली. त्यांनी कंपनी प्रशासनाशी संपर्क साधत निष्पाप स्थानिक चालकांच्या पुनर्नियुक्तीचा मार्ग मोकळा केला. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी युवासेनेच्या नेतृत्वात आलेल्या प्रतिनिधींशी संवाद साधून आश्वासन दिलं आणि पुढाकार घेतला. त्यांच्या मध्यस्थीनंतर कंपनीने कामावरून हटवलेले सर्व ट्रक चालक पुन्हा मूळ पदावर रुजू केले. युवासेना वरोरा भद्रावती विधानसभा समन्वयक तथा ढोरवासा ग्रामपंचायत उपसरपंच मुनेश्वर बदखल व युवासेना जिल्हा प्रमुख आलेख रट्टे यांनी संपूर्ण मुद्दा समजून घेतला आणि स्थानिक पातळीवर सातत्याने पाठपुरावा केला.आलेख रट्टे त्यांनी स्पष्ट सांगितलं की, स्थानिक युवकांवर अन्याय होणार नाही, यासाठी युवासेना कायम सज्ज आहे. ही लढाई शेवटपर्यंत लढणार. स्थानिकांची बाजू लावून धरणारे युवा नेते, प्रतिसाद देणारे खासदार, आणि हक्कासाठी लढणारे कार्यकर्ते यांची ही यशोगाथा चंद्रपूर जिल्ह्यात नवसंघर्षाची प्रेरणा ठरत आहे.



# वैजापूरात अपहरणाचा कट उधळला तीन वर्षांचा कुणाल सुखरूप घरी परतला

## कोपरगावमध्ये गाडी अडवून वाचवला जीव; आरोपी पोलिसांच्या ताब्यात



**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर शहरातील लाडगाव रोड परिसरात तीन वर्षांच्या चिमुकल्याचे अपहरण केल्याची घटना शनिवारी उघडकीस आली. मात्र वेळीच पोलिस आणि नातेवाईकांनी दाखवलेली सतर्कता आणि धाडसामुळे कोपरगाव येथे कुणाल फुलारे या चिमुकल्याचा जीव वाचवण्यात यश आले. या घटनेने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली असून आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे. पीडित बालकाची आई माधुरी गणेश फुलारे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्या लाडगाव रोड परिसरात आपल्या सासरच्या घरी राहतात व मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांचा तीन वर्षांचा मुलगा कुणाल शनिवारी दुपारी साडेपाचच्या सुमारास अंगणात खेळत असताना अचानक गायब झाला.


घटनेच्या वेळी माधुरी यांची आई लताबाई शिंदे अंगणात होती. काही क्षणासाठी बाथरूममध्ये गेल्यानंतर कुणाल दिसेनासा झाला. त्याच वेळी शेजारील महिला कविता शिंदे यांनी सांगितले की, लाल रंगाच्या आयशर गाडीत एक इसम जबरदस्तीने कुणालला घालून घेऊन गेला. गाडी भुसा भरलेली होती व पिवळ्या प्लास्टिकने झाकलेली होती.

घाबरलेल्या माधुरी आणि लताबाईंनी तातडीने वैजापूर पोलिस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी दिलेल्या वर्णनाच्या आधारे गाडी कोपरगावच्या दिशेने गेल्याचा मागोवा घेतला. दरम्यान, लताबाईंनी कोपरगावमधील नातेवाईक गणपत यांना फोनवरून माहिती दिली. सतर्क गणपत यांनी तत्काळ हालचाल करत आयशर गाडी थांबवून त्यातून कुणालला सुखरूप बाहेर काढले.यानंतर लताबाई आणि गणेश फुलारे मोटरसायकलवरून कोपरगावजवळील सौसर गावात पोहोचले. तेथे ग्रामस्थांच्या मदतीने गाडी (MH-14-BJ-4132) आणि आरोपीला ग्रामपंचायत कार्यालयात आणले गेले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव बाजीराव भानुदास कांदळकर (वय ४५, रा. संगमनेर, जि. अहमदनगर) असे सांगितले.पोलिसांनी फुलारे यांच्या तक्रारीवरून बाजीराव कांदळकरविरुद्ध अपहरणाचा गुन्हा नोंदवून अटक केली आहे. त्याने लबाडीच्या इराद्याने व बळाचा वापर करून चिमुकल्याचे अपहरण केल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे.दरम्यान, या घटनेमुळे वैजापूर शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र पोलिसांनी वेळेवर कारवाई करून मुलाला सुखरूप परत आणल्याने पालकांसह नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. या घटनेप्रकरणी अधिक तपास वैजापूर पोलीस करीत आहेत.

# आमदार ताई, शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे कधी करणार?

## शेतकरी म्हणतोय,फळबागा उध्वस्त,अधिकारी गायब!


**धुळे । उमाकांत अहिरराव**



साक्री तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यांमुळे अनेक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. माळमाथा आणि पश्चिम पट्ट्यातील सोलाशे अधिक गावांमध्ये कांद्याची पिके, मका आणि फळबागा अक्षरशः उद्ध्वस्त झाल्या असून शेतात पडलेला कांदा चिखलात गाडला गेला आहे. मात्र अजूनही ना लोकप्रतिनिधी आले, ना अधिकारी पंचनाम्यासाठी फिरकले, अशी जोरदार खंत बळीराजाने व्यक्त केली आहे. काटवान, माळमाथा, सोनगीर, आझादनगर, पिंपळनेर, हिंगणे, माणके, खर्डी आदी गावांमध्ये जोरदार पावसामुळे केवळ पिकांचंच नव्हे तर गुरांसाठी साठवलेला चारा देखील भिजून वाया गेला आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज घेऊन फळबागा फुलवल्या होत्या. डाळिंब, पपई, केळी यांना देखील पावसाचा जबरदस्त फटका बसला आहे. या संपूर्ण संकट काळात तहसीलदार, कृषी अधिकारी किंवा ग्रामसेवक देखील शेतकऱ्यांच्या बांधावर फिरकलेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. शेतकऱ्यांच्या मते, तालुक्याचे आमदार तथा लोकप्रतिनिधी विविध लग्नकार्यांत व्यग्र असून शेतीची खबरबात घेण्याची कोणालाच उसंत नाही.या परिस्थितीत राज्यातील फडणवीस-शिंदे-पवार सरकारकडे मदतीची आशा बाळगणाऱ्या शेतकऱ्यांना आता पंचनामा कधी? आणि भरपाई केव्हा? असे दोन मूलभूत प्रश्न सतावत आहेत. वेळेवर पंचनामे झाले नाहीत, तर शासन दरबारी नुकसान भरपाईसाठी अर्ज करणेही शक्य होणार नाही.शेतकऱ्यांनी स्पष्टपणे सांगितले की, आमदार शिरीषा गावित यांनी स्वतः पुढाकार घेऊन नुकसानग्रस्त भागांची पाहणी करावी आणि तातडीने पंचनाम्याचे आदेश द्यावेत. अन्यथा या उदासिनतेचा रोष लवकरच लोकप्रतिनिधींवर व्यक्त होईल, असा इशारा अनेक गावकऱ्यांनी दिला आहे.

# नागभीड तालुक्यात गारपिटीचा कहर; ६८४ हेक्टर पिकांचे नुकसान

**नागभिड । प्रतिनिधी**



तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपिटी आणि अवकाळी पावसाने मोठे नुकसान केले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे अंदाजे ६८४ हेक्टर क्षेत्रावर उभ्या असलेल्या उन्हाळी धानपिकांचे नुकसान झाले आहे. प्राथमिक माहितीनुसार, तीन दिवसांच्या सर्वेक्षणानुसार मिंडाळा, तळोधी (बा.) आणि गिरगाव या तीन मंडळांमध्ये पिकांचे नुकसान झाले आहे.

मिंडाळा मंडळात सर्वात जास्त नुकसान झाले आहे, ३५१ हेक्टर क्षेत्रातील धानपिकं गारपिटीने उध्वस्त झाली आहेत. विशेषत: मिंडाळा मंडळातील चिंधीचक, चिंधीमाल, जनकापूर, पळसगाव, ओवाळा येथील शेतकऱ्यांची मोठी हानी झाली आहे. याचप्रमाणे तळोधी (बा.) मंडळात २५७ हेक्टर क्षेत्रात नुकसान झाले आहे, जेथे उश्राळमेंढा, गंगासागर हेटी, आकारपूर, सावर्ला, लखमापूर, खरकाडा, आलेवाही या ठिकाणांवर गारपिटीने शेतकऱ्यांची कष्टाची जमीन उध्वस्त केली. गिरगाव मंडळात ७६ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे आणि ९५ शेतकऱ्यांचे पिक नष्ट झाले आहेत.

नुकसानीच्या प्रारंभिक माहितीचे पंचनामे ६ मे पासून सुरू झाले आहेत. तहसीलदार प्रतापराव वाघमारे यांच्या आदेशानुसार, १३८ गावांमध्ये पंचनामे सुरू असून, या प्रक्रियेत नुकसानीचे अधिकृत आकडे वाढण्याची शक्यता आहे. सर्वेक्षण पूर्ण होण्यासाठी आणखी ४ ते ५ दिवस लागण्याची अपेक्षा आहे.५ मे रोजी शेतकऱ्यांनी तहसीलदारांना भेटून नुकसानभरपाईची मागणी केली होती, त्यानंतर पंचनामे सुरू झाले. गारपिटीमुळे उभे धानपिक भूईसपाट झाले आणि शेतामध्ये धानाचा सडा पडला, ज्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले. या गारपिटीच्या तडाख्याने शेतकऱ्यांचे पिक नष्ट झाले आहेत, विशेषत: काढणीला आलेले धान पिक.

तहसीलदार वाघमारे यांनी सांगितले की, नुकसानीचे सर्वेक्षण नियमितपणे सुरू राहणार असून, शेतकऱ्यांना योग्य मुआवजा मिळवण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. याबाबत प्रत्येक शेतकऱ्याच्या नुकसानाची काळजी घेतली जाईल आणि सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर नुकसानभरपाईची प्रक्रिया सुरू केली जाईल.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .